**धन्य माऊली तू सविंदर माता**

**चालः विठु माऊली तू माऊली जगाची**

धन्य माऊली तू सविंदर माता
धन्य तुझी गाथा जीवनाची
माऊली युगनिर्माता (धु)

सदगुरूच्या संगे चाले दिनरात
गुरूभक्त बनुनीया वावरे जगात
आदर्श तु सुन आदर्श तु लेक
स्नेहाने तु जोडलेस बंध हे अनेक
माऊली  जगतविधाता
जीवन संगीनी गुरू हरदेवाची (१)

वादळी तुफानी आली होती वेळ
ऐश्या समयाला तुच तारीले सकळ
समर्पित तुझा जीवन प्रवास
दिपस्तंभ बनुनीया दिधला प्रकाश
माऊली  दयाळू विधाता
दिव्य थोरवी ही तुझीया गुणाची (२)

देहाचे ते कष्ट सोसुनिया सारे
वरदायिनी तु वर  दिधले आम्हा हे
तुझ्या उपकारा जगी तोड नाही
राजेश हे गुण गाई क्रुपावंत आई

माऊली सुखवरदाता

र्निगुणाला स्मरुनी झाली र्निगुणाची (३)